**सं.फौ.ख.क्र. ५४३/२०२३**

**प्रकाश काळे –वि– गौतम संकलेचा**

**निशाणी क्र. १८ खाली.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ प्रकाश पूंडलिक काळे यांचा शपथेवर ज्यादाचा सरतपास फिर्यादीचे विधिज्ञ श्री. पी. एस. कोतवाल यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१. मी प्रस्तुतकामी आरोपीने मला दि.०६.०७.२०२३ रोजी दिलेला मूळ धनादेश क्र. ८८८९४० दाखल केलेला आहे. त्यावर आरोपी क्र. १ ची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **निशाणी २३** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी तो चेक बँकेत भरल्याची मुळ पावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाणी २४** देण्यात येते. तो चेक परत आल्याचा मूळ चेक रिटर्न मेमो मी प्रस्तुतकामी दाखल केलेला आहे. त्यावर बँकेचा शिक्का व संबंधित अधिकाऱ्याची सही आहे. त्याला **निशाणी २५** देण्यात येते. मी माझ्या वकिलांमार्फत आरोपीला दि.१८.०७.२०२३ रोजी आ.क्र. १ ला पाठवलेल्या नोटीसीची स्थळ प्रत दाखल केलेली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्याला **निशाणी २६** देण्यात येते. मी माझ्या वकिलांमार्फत आरोपी क्र. २ ला दि.१८.०७.२०२३ रोजी पाठवलेल्या नोटीसीची स्थळ प्रत दाखल केलेली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्याला **निशाणी २७** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी आरोपी क्र. १ ला रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविल्याची पोस्टाची मूळ पावती दाखल केलेली आहे. त्याला **निशाणी २८** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी आरोपी क्र. २ ला रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविल्याची पोस्टाची मूळ पावती दाखल केलेली आहे. त्याला

**निशाणी २९** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी आरोपी क्र. १ ला नोटीस मिळाल्याची मुळ पोहोच पावती दाखल केलेली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्याला **निशाणी ३०** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी आरोपी क्र. २ ला नोटीस मिळाल्याची मुळ पोहोच पावती दाखल केलेली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्याला **निशाणी ३१** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी आरोपींनी मला पाठवलेली मुळ उत्तरी नोटीस दाखल केलेली आहे. त्यावर आरोपी व त्यांच्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खोटा व चुकीचा आहे. त्याला **निशाणी ३२** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी बँक ऑफ महाराष्ट्र मधील माझ्या खात्याचा उतारा दाखल केलेला आहे. त्यावर संबंधित बँकेच्या अधिकाऱ्यांची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी ३३** देण्यात येते. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खरा व बरोबर असून तो माझ्या सांगण्यानुसार लिहिलेला आहे.

**ज्यादाचा सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. ए. टी. देवरे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. माझे शिक्षण बी.ए.बीएड झालेले आहे. मी दि.३१.०५.२०२१ रोजी सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की मी जी शेती विकत घेतली ती कागदपत्र करुन विकत घेतली. हे म्हणणे खरे नाही की कोणताही व्यवहार करावयाचा झाल्यास तो लेखीच करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की आतापर्यंत मी जे व्यवहार केलेले आहेत ते सर्व लेखी केलेले आहेत.

३. आरोपींवर माझा विश्वास असल्यामुळे मी त्यांना पैसे देतांना कोणतेही लेखी कागदपत्र करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी व आरोपी एकाच समाजाचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी व आरोपी एकाच

समाजाचे नसल्यामुळे आमचे एकमेकांच्या घरी येणे–जाणे नव्हते. मी आरोपींच्या घरी कोणत्या तारखेला, कोणत्या सणाला गेलो हे मला सांगता येणार नाही. मी माझ्या ज्या बँक खात्यामधून आरोपीला देण्यासाठी पैसे काढले त्याचा खाते उतारा मी निशाणी ३३ कडे दाखल केलेला आहे.

४. आरोपींनी माझ्याकडे कोणत्या तारखेला पैशाची मागणी केली ते मला सांगता येणार नाही. हात उसनवार म्हणून मी आरोपी व्यतिरिक्त मच्छींद्र टोपे, संतोष आहेर यांना पैसे दिले होते. मी आरोपींव्यतिरिक्त हात उसनवार म्हणून इतर कोणालाही मोठी रक्कम दिली नाही. मी निशाणी २३ कडील चेक बघितलेला आहे. मला आता निशाणी २३ कडील चेक दाखवण्यात आला. त्यावरील अक्षर माझ्या मुलाचे आहे. निशाणी २३ कडील चेकवरील माझे नाव माझ्या मुलाने लिहिलेले आहे व त्यावरील अक्षरी रक्कम आरोपीने स्वतः लिहिलेली आहे. निशाणी २३ कडील चेकवर आरोपी क्र. २ ची सही नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की आ.क्र. २ सोबत माझा कोणताही व्यवहार नाही.

**उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.01.21 16:57:30 +0530

**दिनांक – २१/०१/२०२६** **( वृषाली दी. सुंगारे)**

**ठिकाण –चांदवड.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**